 Impact Factor : 0.4521 (UIF)
ISSN:- 2393-8900

Research Article

# सिनामाई कृषी विज्ञान मंडळ - शेतकऱ्यांसाठी दिपस्तंभ

**राजेंद्र गायकवाड**
इतिहास विभागप्रमुख, विठ्ठलराव शिंदे कला महाविद्यालय, टेंभुर्णी, ता. माढा, जि. सोलापूर,

**प्रस्तावना -**

भारत हा कृषीप्रधान देश आहे. भारतातील बहुतांश शेती कोरडवाहू आहे. ती नैऋत्य मोसमी पर्जन्यावर अवलंबून आहे. मान्सून व्यवस्थित बरसला तरच शेतकरी सुखावतो. अन्यथा शेतकऱ्यांच्या जीवनात दुःखाला पारावार राहत उरत नाही. शेतकऱ्याच्या जीवनात हास्य खुलवण्याचे काम मान्सून करतो. शेतकरी राजा सुखी झाला तरच देशात सुजलाम, सुफलामता येते. कोरडवाहू शेतीबरोबरच बागायती शेतीला सिंचनासाठी तलाव, विहीर, धरणे, कॅनॉलचा वापर केला जातो. भारतात बरसणारा मान्सून हा लहरी आहे. त्याच्या लहरीपणामुळे कधी ओला तरी कोरडया दुष्काळाची स्थिती निर्माण होते. एकंदरित पर्जन्याच्या लहरीपणाचा शेती आणि शेतकऱ्याच्या जीवनावर सातत्याने परिणाम होत आला आहे. नैसर्गिक संकंटाबरोबरच वाढता भांडवली खर्च, मजुरांचा तुटवडा व मजुरीचे वाढते दर, खते बी-बीयाणे नवनवीन वाणाविषयीच्या ज्ञानाचा अभाव, शेतीविषयक विज्ञान तंत्रज्ञानातील मागासलेपणा, शेतीविषयक अपुरे ज्ञान, युवक वर्गाची शेतीकडे पाहण्याची संकुचित व पूर्वग्रहदूषित दृष्टी यासारख्या असंख्य समस्यांनी कृषीक्षेत्राला आपल्या विळख्यात घेतले आहे. शेतकरी प्रत्येक मोसमात मोठया आत्मविश्वासाने संकटांना सामोरा जात आला आहे. परंतू त्याचे प्रयत्न अपुरे पडत आहेत. तरीही तो न खचता प्रयत्नवादी असतो. शेतकऱ्यांच्या याच प्रयत्नवादाला धागा पकडून आज देशाच्या, राज्याच्या विविध भागात नव्या उमेदीचे, नव्या दमाचे कृषीमित्र, शेतकरी आपापल्या अनुभवाच्या जोरावर शेतीमध्ये नवनवीन उपक्रम राबवत आहेत. प्रत्येकांचे मार्ग वेगळे असतील परंतू ध्येय मात्र एकच आहे. शेती समोरील आव्हानांना खंबीरपणे प्रत्युत्तर देवून शेतीचा शाश्वत विकास करुन शेतकरी राजाच्या जीवनात हास्य खुलवून सधनता आणणे. सोलापूर जिल्हयातील रिधोरे गावच्या "सिनामाई कृषी विज्ञान मंडळ" यांनी आपल्या उपक्रमशीलतेच्या जोरावर महाराष्ट्राच्या नकाशावर आपली वेगळी ओळख निर्माण केली आहे. प्रस्तुतचा शोधनिबंध रिधोरे गावातत कार्यरत असणाऱ्या सिनामाई कृषी विज्ञान मंडळाच्या उपक्रमापुरता मर्यादित आहे. आधुनिकीरणामुळे जगाचे रुपांतर खेडयामध्ये झाले आहे. त्याप्रमाणे रिधोरे गावातील उपक्रमशील शेतकऱ्यांनी केलेले कार्य नक्कीच कौतुकास्पद आहे. मंडळाची कामगिरी समस्त शेती निष्ठांना मार्गदर्शक, प्रेरक व एखाद्या दिपस्तंभाप्रमाणे महत्त्वपूर्ण ठरणार आहे. तिचा सर्वत्र प्रसार होवून आधुनिक शेती व शेतकऱ्यांना त्याचा लाभ व्हावा, स्थानिक इतिहासाच्या अभ्यासाची उकल विद्वज्जनांना व्हावी हयासारख्या उद्देशाने या शोध निबंधाचे लेखन करण्यात आले आहे. यासाठी मंडळाची स्थापनेची घटना, वृत्तपत्रे, मासिके यामधून छापून आलेले लेख, प्रत्यक्ष मुलाखती, याद्वारे माहिती संकलित करण्यात येवून तिच्यावर शास्त्रीय संस्कार करुन ऐतिहासिक, समाजशास्त्रीय संशोधन पध्दतीचा वापर करून शोधनिबंध लिहिला आहे.

**रिधोरे गावचा पूर्वेतिहास -**

सोलापूर जिल्हयातील माढा तालुक्यातील कुर्डूवाडी-बार्शी रोडवर सीना नदीच्या काठावर रिधोरे हे गाव वसले आहे. रूद्रेश्वर ग्रामदेवतेच्या नावावरून या गावाला रिधोरे हे नाव प्राप्त झाले आहे. इथली लोकसंख्या जेमतेम तीन हजारांची आहे. सीना नदी अहमदनगर जिल्हयात उगम पावून पुढे

सोलापूरकडे वाहते. नगर जिल्हयात पाऊस काळा चांगला झाला तरच या नदीला पाणी येते. अलीकडे कोळेगाव ता. परंडा येथे धरण झाल्याने तिचा प्रवाह अडवला गेल्याने सीना नदीला पावसाचे गढूळ पाणी आल्याचे चित्र पाहावयास मिळत नाही. रिधोरे गाव हे पूर्वीच्या निजाम राजवटीच्या सरहद्दीवरील गाव आहे. निजाम राजवटीच्या अनेक किस्स्यांची चर्चा आजही वयोवृध्दांकडून ऐकावयास मिळते. पुणे-लातूर राज्य महामार्गावरील रिधोरे हे महत्त्वाचे गाव आहे. ब्रिटिश राजवटीत कुर्डुवाडी-लातूर या नॅरोगेज लोहमार्गावरील रिधोरे हे एक स्टेशन होते. साधारणपणे २० व्या शतकाच्या पहिल्या दशकात सुरु केलेल्या लोहमार्गाच्या बांधणीवेळी सीना नदीवर उभारलेला दगडी पुल आजही ब्रिटिश राजवटीची साक्ष देत दिमाखात उभा आहे. ब्रिटिश राजवटीतील उत्कृष्ट अभियांत्रिकी स्थापत्याचा नमुना म्हणूनही या पुलाकडे पाहिले जाते. पुलाला शंभर वर्षे पुर्ण झाल्याचे पत्र थेट इंग्लंडवरून आल्याचे व त्यावरून भारतीय रेल्वे विभागाने त्याची डागडूजी केल्याची माहिती मिळते.[१] हा मार्ग पुढे येडशी मार्गे लातूरला जात होता. येडशीच्या डोंगराळ भागात ब्रिटिशांनी उन्हाळयाच्या दिवसात उपयुक्त असणारे हवेशीर असे हिल स्टेशन उभारले होते. यामार्गे प्रवास करताना बऱ्यांचदा ब्रिटिश लोक सीना नदीत आंघोळीला, मौजमजा करत होते अशी माहिती मिळते.[२]

**शेतीची सिंचनाची व्यवस्था व आर्थिक भरभराट -**

येथील शेतकरी पारंपारिक पध्दतीने ज्वारी, गहू,हरभरा, करडई, तूर, मूग यासारख्या पिकांचे उत्पादन घेत होते. सीना नदी हंगामी असल्याने शेतीच्या सिंचनासाठी तिचा फारसा उपयोग होत नव्हता. २००४-०५ पूर्वी गावातील एकूण क्षेत्रापैकी १० टक्केच्या आसपास शेती सिंचनाखाली आली होती. पाण्याचा मुख्य स्त्रोत म्हणजे नदीमध्ये खड्डे खोदून सिंचनासाठी वापरणे. या पाण्याची चवही खारट, सवळ असल्याने शेतीच्या उत्पादन वाढीपेक्षा शेतजमीनी चोपण व खारवट झाल्या. त्यामुळे रिधोरे गावातील बागायती शेतीचे क्षेत्र वाढत नव्हते. मागे युती सरकारच्या कालखंडात नदी जोड प्रकल्पांर्तगत भीमा-सीना नदी जोड प्रकल्प यशस्वी करण्यात आला. कृष्णा खोरे विकास योजनेच्या २००४-०५ मध्ये या माध्यमातून उजनी धरणालगतच्या कंदर ता. करमाळा ते कव्हे ता.माढा या मार्गे आशिया खंडातील सर्वात जास्त लांबीचा बोगदा खोदून शिराळा ता. परांडा येथे भीमा नदीचे पाणी सीना नदीत सोडण्यात आले.[३] या कामी माढा तालुक्याचे आमदार मा. बबनदादा शिंदे यांचे कार्य महत्त्वपूर्ण आहे. सीना नदीवर रिधोरे गावाच्या लगतच कोल्हापूरी पध्दतीचा बंधारा बांधण्यात आल्याने शेतीसाठी उजनी धरणाचे पाणी साठले जाणार व इथल्या शेतजमीनी हिरव्यागार होणार या आनंदाने सर्वत्र आनंदोत्सव साजरे झाले. पिढयान पिढयाच्या कोरडवाहू शेतकऱ्यांच्या आनंदाला पारावार उरला नाही. नदीकाठच्या सर्व शेतकऱ्यांनी कात टाकून शेती कसण्याला प्राधान्यक्रम दिला. गावाकडे पोट भरत नाही म्हणून जगण्यासाठी शहराकडे गेलेली अनेक कुटुंबे गावाकडे परतली. सीनेला पाणी आल्याने या परिसराच्या नवीन आर्थिक, सामाजिक, सांस्कृतिक बदलाच्या हालचाली सुरू झ ाल्या. गावागावांमध्ये चैतन्य पसरले. शेतकऱ्यांनी सरसकटपणे ऊस या नगदी पिकाला प्राधान्य दिले. ऊस पिक हे येथील शेतकऱ्यांच्या जगण्याचा श्वास बनले. जिकडे तिकडे ऊसाची चर्चा होवू लागली. कित्येक शेतकऱ्यांनी चार-पाच किलोमीटर पर्यंत पाईपलाईन्स करून आपली ओसाड शेती फुलवली. प्रसंगी बँकांची कर्जे काढली. प्रत्येकाच्या डोळयात हिरवी स्वप्ने होती. पहिली चार-पाच वर्षे पाऊसकाळ भरभरून झाला. रिधोरे आणि परिसरात आर्थिक समृध्दता आली. ज्या गावामध्ये एकेकाळी सायकल वरून फिरणे सुध्दा अभिमानास्पद होते त्याच गावात आत्ता दुचाकी मोटारगाडयांची विविधता पाहावयास मिळाली. छपराची, पत्र्याची, पावसाळयात पाझरणाऱ्या घरे हद्दपार होवून त्यांची जागा स्लॅबची पक्क्या व आकर्षक घरांनी घेतली. रिधोरे गावातील लोकांचे राहणीमान, जीवनमान उंचावले. नदीकाठ फुलल्याने, बहरल्याने शेजारील चिंचगाव टेकडीच्या माळरानावरती मा. संजयमामा शिंदे यांनी साखर कारखाना उभारला. यामुळे शेतकऱ्यांचा ऊस वेळेत गाळपासाठी तर गेलाच परंतू दरही चांगला मिळाला. शेतकरी सधन व समाधानी झाला.

**सिनामाई कृषी विज्ञान मंडळाची स्थापना :**

सीना नदीतील पाण्यामुळे रिधोरे व सीनाकाठ समृध्द झाला. आर्थिक भरभराट, संपन्नता आली. तशी शेती वरील आधारित लोकांचे प्रमाणही वाढले. पाऊसकाळ चांगला झाल्याने, उजनी धरणात क्षमतेपेक्षाही जास्त पाण्याचा संचय झाल्याने, सीनेमधे नियमित पाणीपुरवठा होत राहिला. ऊस हे नगदी पिक रिधोरे गावातील व परिसरातील लोकांचे जीवनावश्यक पिक बनले. पहिली पाच वर्षे पावसाच्या सुकाळामुळे सर्वत्र आनंदी आनंद पसरला होता. शेती हा आमच्या पूर्वजांनी आमच्यासाठी पुढील पिढयांसाठी ठेवलेला वारसा आहे याचा विसर लोकांना पडत चालला होता. बागायती क्षेत्राच्या विस्ताराबरोबरच रासायनिक

खतांच्या अतिवापराची, मुक्त पाणी देण्याच्या पध्दतीमुळे जमीनी नापीक होण्याची स्थिती येवू शकते याची कुणकुण गावातील तरूण शेतकऱ्यांना लागली. यावेळी २००२ मध्ये रिधोरे गावचे सुपुत्र श्री. सयाजीराव गायकवाड आपल्या स्वगावी कृषी सहायक म्हणून रूजू झाले होते.[४] सिना नदीला पाणी येण्यापूर्वीची गावची कृषी व शेतकरी जीवन अत्यंत भयावह होते. सात बाऱ्यावर दोन आकडयामध्ये ज्यांच्या जमीनीच्या नोंदी आढळत होत्या असे शेतकरीही मजूर म्हणून रोजंदारी करत होते. सयाजीरावांच्या आगमनानंतर २००४ मध्ये लगेच सीना नदी बोगद्यामुळे बारमाही स्वरूपात बदलून गेली.[५] बदल सुखावणारा होता. तसेच जबाबदारी वाढवणारा पण होता. कारण एक अधिकारी म्हणून आपण नवनवीन उपक्रम हातामध्ये घेवून शेतकरी राजाला सुखी करण्याची स्वप्ने पाहणाऱ्या तडफदार अधिकाऱ्याच्या सचोटीचा हा काळ होता. सयाजीरावांनी गावातील समविचारी तरूण शेतकऱ्यांनामध्ये शेती विषयक नवनवीन शोध, तंत्रज्ञान, विद्यापीठीय संशोधन यासारख्या विषयाची गोडी निर्माण केली. सुरुवातीला प्रतिसाद लाभला नाही. परंतू पाण्याच्या चैतन्यासोबतच वैज्ञानिक चैतन्यही ग्रामस्थांच्या नसासनसात खेळवण्यासाठी सयाजीरावांनी नवीन संकल्पना मांडली. ती म्हणजे आपण आपल्या गावात एखादे कृषी विज्ञान मंडळ स्थापन करण्याची. सयाजीरावांच्या विचाराला मान्यता देत गावातील श्री.सत्यवान गायकवाड, श्री. काशीनाथ माने, श्री. राजकुमार गायकवाड, श्री. संजय गायकवाड, श्री. धनाजी गायकवाड, श्री. संजय गायकवाड, श्री. दत्तात्रय गायकवाड, श्री. हनुमंत गायकवाड, श्री. भारत गायकवाड, श्री. सोमनाथ गायकवाड, प्रा. डॉ. उल्हास गायकवाड इत्यादी तरूण सहकाऱ्यांना हाताशी घेवून गांधी जयंतीचे औचित्य साधून दि. २ ऑक्टोबर २००४ रोजी " सिनामाई कृषी विज्ञान मंडळाची" धर्मादाय आयुक्त, सोलापूर कडे नोंदणी करून मंडळाची स्थापना केली. श्री. सत्यवान गायकवाड हे अध्यक्ष पदी तर, सयाजीराव सचिव पदी काम पाहू लागले.[६] गांधीजींच्या विचारातील भारत घडवण्यासाठी व त्यांच्या खेडयाकडे चला घोषवाक्याला प्रमाण मानून सयाजीरावांनी एक पाऊल उचलले होते. मंडळाचे बोधचिन्ह म्हणून "बळीराजा" चे चित्र ठरवले तर, घोष वाक्य घेतले - "उत्तम शेती हीच निती - एसेंरा शेती शाश्वत शेती." रिधोरे गावात राहून बळीराजाच्या कृषीविषयक धोरणानुसार वाटचाल करण्याचा मानस करून वाटचाल सुरु झाली. जोडीला एकात्मिक सेंद्रीय रासायनिक शेती शाश्वत शेती याचा ध्यास घेवून सयाजीरावांनी शेती कसण्यासाठी सेंद्रीय व रासायनिक खतांची जोड दिली पाहिजे या विचाराने मंडाच्या कार्याला प्रारंभ केला. मंडळाच्या घटनेमध्ये ३६ प्रकारचे उद्दिष्टये डोळयासमोर ठेवण्यात आली. पैकी आधुनिक पध्दतीने शेती कशी करावी याचे ज्ञान शेतकऱ्यांना करून देणे, शेतीला योग्य वेळी आवश्यक त्या निविष्ठा पुरविणे, खते पुरविणे, पिक चिकित्सालय सुरू करणे, कृषी विद्यापीठीय स्तरावरील नवनवीन संशोधन शेतकऱ्यांपर्यंत कमी वेळेत पोहचविणे, तरुणांना शेती करण्यासाठी प्रवृत्त करणे, युवकांचा व्यक्तिमत्व विकास करून त्यांचे जीवनमान उंचावण्यास हातभार लावणे, शेतकऱ्यांचा शेतीविषयक व्यावसायिक व स्पर्धात्मक दृष्टिकोन विकसित करणे यासारख्या उद्दिष्टांवर लक्ष्य केंद्रीत करण्यात आले. वास्तविक शेतकऱ्यांसाठी कार्य करणाऱ्या महाराष्ट्रातील विविध प्रकारांपैकी या मंडळाचे उपक्रम वेगळेच होते. म्हणूनच ते नावीन्यपूर्ण होते. मंडळाच्या रूपाने तमाम शेतकऱ्यांसाठी एका प्रयोगशाळेचीच सुरूवात होती. भोळयाभाबडया लोकांना अध्यात्मिक व धार्मिक स्वास्थ मिळवून देण्याच्या नावावरती गावोगावी मंदीरांची रचना होते, विद्या ज्ञान देण्यासाठी जिकडे तिकडे शाळा रूपी ज्ञान मंदीरे उभारली गेली. मग पिढयानपिढया रानावना मध्ये काबाडकष्ट करुन सर्वांचे पोट भरणारा शेतकरी राजाचे एखादे ज्ञान मंदीर का नसावे? या सयाजीरावांच्या कल्पनेतून "शेतकरी ज्ञान मंदीराची " रचना झाली.[७] शेतकरी राजा ज्ञानवंत झाला पाहिजे, कारण ज्ञान हीच शाश्वत गोष्ट असून ती चिरकाल टिकणारी आहे या विचाराची कास धरून सयाजीरावांनी या मंडळाचा रथ हाकण्यास सुरूवात केला. काळानुरूप मंडळासाठी एखादी हक्काची जागा व इमारत असावी या विचारातून २०११ मध्ये ग्रामपंचायतीच्या हद्दीतील हनुमान मंदीराच्या वरील जागा ९९ वर्षाच्या करारावर घेवून लोकवर्गणीतून ६ लाख रूपए जमवून मंडळाची टोलेजंग इमारत उभारण्यात आली. त्या इमारतीला "शेतकरी ज्ञान मंदीर" नाव देण्यात आले.

**शेतकरी ज्ञान मंदीरात उपलब्ध सुविधा -**

शेतकरी ज्ञान मंदीरात खालील कायमस्वरुपी माहिती फलक व सुविधा कार्यरत आहेत.

**१. कायमस्वरुपी कृषी प्रदर्शन -** शेतकऱ्यांना कायमस्वरूपी बी-बीयाणे, खते, औषधे आणि शेतीची औजारे याची माहिती व्हावी म्हणून कायमस्वरूपी कृषी प्रदर्शन उभारले आहे.

**२. कृषी तत्वज्ञान माहितीचे डिजिटल फ्लेक्स -** शेतकऱ्यांना विविध पिकांच्या लागवडीपासून ते काढणीपर्यंतचे तंत्रज्ञान व त्यामागील विचार सोप्या भाषेत व मुद्देसूदपणे ज्ञान मंदीरात वाचता येतात, ज्वारी, गहू, हरभरा, ऊस इ. पिकांसोबतच शेतीपूरक दुग्धव्यवसाय, कुक्कुटपालन व्यवसायाविषीचीही आवश्यक माहिती डिजीटल फ्लेक्स स्वरूपात लावण्यात आली आहे.

**३. दृकश्राव्य माध्यमांचा वापर -** शेती क्षेत्रातील बदल नवनवीन तंत्रज्ञान, दृकश्राव्य स्वरूपात शेतकऱ्यांपर्यंत पोहचविण्यासाठी एक मोठा एल.सी.डी, संगणक, इन्व्हर्टर, साऊंड सिस्टम ने परिपूर्ण विभागही येथे कार्यरत आहे. याची किंमत साधारणपणे २ लाखांच्या आसपास आहे.

**४. शेतीचा दवाखाना -** माणसांना, जनावरांना जसे दवाखाने असतात त्याचप्रमाणे शेतीवरील विविध आजार म्हणजे रोगराई, कीटकांचा प्रादुर्भाव, यांपासून शेती संरक्षित करण्यासाठी शेतीचा दवाखाना ही अभिनव योजना सयाजीरावांनी राबवली व यातून शेतकऱ्यांना मार्गदर्शन होते.[८]

**शेतकरी ज्ञान मंदीराचे उपक्रम -**

शेतकरी ज्ञान मंदीराच्या स्थापनेपासून खालील महत्त्वपूर्ण उपक्रम मंडळ प्रत्येक वर्षी राबवत आहे.

**१. शेतीशाळा -** ज्ञामंदीरात प्रत्येक महिन्याच्या २ तारखेला रात्री ७ -०० वाजता सभासद शेतकरी व गरजूवंतासाठी मोफत शेती शाळा चालते. शाळेची सुरुवात ''इतनी शक्ती हमे देना दाता मनका विश्वास कमजोर हो ना'' या गीताने होते. यावेळी उपस्थितांपैकी एकाला अध्यक्ष केले जाते. त्यानेच उपस्थितांना चहापाणी, नाष्ट्याची सोय करण्याचा परंपरा पाडण्यात आली. यावेळी त्या-त्या मोसमातील गावातील पिके, रोगराई, पिकांच्या वाढीसाठी व उत्पन्न वाढीसाठीच्या मुद्दयांची सखोल चर्चा सयाजीरावांच्या किंवा भेटीला आलेल्या मान्यवर वक्त्यांच्या मार्गदर्शनाखाली होते. प्रत्येक महिन्याच्या शेतीशाळेचा अहवाल तयार केला जातो. साधारणतः शेती, व्यापार, शिक्षण, तंत्रज्ञान या क्षेत्रातील मान्यवरांनी येथे मागर्दशन केले आहे.

**२. ऊस पिकासाठी स्वतंत्र चर्चासत्रे व मागदर्शक शिबीरे -** सीना नदीला पाणी आल्यापासून ऊस हे प्रमुख पिक बनले आहे. ऊसासारख्या नगदी पिकाच्या लागवडी पासून ते गाळपापर्यंतच्या प्रत्येक टप्प्याचे शेतकऱ्यांना मार्गदर्शन व्हावे हा मंडळाचा उद्देश असल्याने अनेक मान्यवर ऊस संशोधकांनी येथे येवून शेतकऱ्यांना मार्गदर्शन केले आहे. विज्ञान मंडळाच्या वर्धापन दिनी किंवा महत्त्वाच्या प्रसंगी मंडळाने ऊस पिकावर चर्चासत्र व शेतकरी शिबीरे आयोजित केली आहेत. काही मान्यवर खालील प्रमाणे ङ

| अ.क्र. | मान्यवर व्यक्ती | पद | ठिकाण |
|---|---|---|---|
| १ | श्री. संपतराव जाधव | वरिष्ठ शास्त्रज्ञ | व्ही.एस.आय. पुणे |
| २ | डॉ. अनिल दुरगुडे | मृदा शास्त्रज्ञ | म.फुले कृषी विद्यापीठ, राहूरी |
| ३ | डॉ. आर. सी. पाटील | फुले-२६५ ऊस वाण पैदासकार | पाडेगाव ऊस संशोधन केंद्र |
| ४ | डॉ. एस.बी.माने-पाटील | वरिष्ठ शास्त्रज्ञ | व्ही.एस.आय. पुणे |
| ५ | कृषीभूषण संजीव माने | ऊस तज्ज्ञ | वाळवा जि. सांगली |
| ६ | कृषीभूषण वि.ग.राऊळ | माजी संचालक | कृषी विभाग महा.शासन |
| ७ | श्री. सु.ल.जाधव | संचालक | कृषी विभाग महा.शासन |
| ८ | डॉ. रामकृष्ण मुळे | माजी संचालक | कृषी विभाग महा.शासन |
| ९ | श्री. विकास देशमुख | आयुक्त | कृषी विभाग महा.शासन, मुंबई |
| १० | श्री. डी.के. जैन | सचिव | कृषी विभाग महा.शासन |

मान्यवर तज्ज्ञांच्या मागदर्शनाचा लाभ घेवून गावातील शेतकरी वर्गानी ६७१, ८६०३२, फुले २६५ यासारख्या ऊसाच्या वाणांची लागवड करून विक्रमी उत्पन्न कमावले आहे. श्री. दत्तात्रय गायकवाड यांनी १०८ टन, श्री. सयाजीराव गायकवाड यांनी ९३ टन, श्री. काशीनाथ माने यांनी ९० टन, श्री. राजकुमार पाटील यांनी ७० टन ऊसाचे विक्रमी उत्पादन घेतले आहे. यांच्या पासून प्रेरणा घेवून गावातील व परिसरातील शेतकऱ्यांनीही लागवडीचा खर्च कमी करून उत्पन्नामध्ये वाढ केली. वर्धापन दिनीच्या कार्यक्रमाचे स्पॉन्सरशिप बहुतांशवेळेला खत कंपन्या, ठिबक कंपन्यांनी स्वीकारले. यावेळी होणारा ४० ते ५० हजाराचा खर्च या कंपन्या करतात. यातून मंडळाच्या कार्याचा प्रसार ध्यानात येतो.

**३. शेतकऱ्यांच्या बांधावर रासायनिक खते -** मंडळाच्या उद्दिष्टांनुसार शेतकऱ्यांना त्यांच्या बांधापर्यंत रासायनिक खते पुरवण्याचे कार्य मंडळ गेली कित्येक वर्षे करते आहे. देशातील रासायनिक खत निर्मितीतील अग्रगण्य IFFCO या कंपनीने रिधोरे गाव व मंडळाचे पालकत्व स्वीकारून खत टंचाईच्या कालावधीत पिकांच्या भरभराटीच्या काळात हजारो पोती खते उपलब्ध करून शेतकऱ्यांचे नुकसान टाळले आहे. या उपक्रमात IFFCO कंपनीचे जिल्हा विक्री अधिकारी मा.श्री. रविंद्र सने साहेब यांचे मोलाचे सहकार्य झाले. याशिवाय महाराष्ट्र शासनाच्या कृषी विभागाच्या ऊस विकास योजनेनुसार हजारो शेतकऱ्यांना फवारणीची खते, रासायनिक खते, जीवाणू खते, सूक्ष्म अन्नद्रव्य खते, अॅझोटोबॅक्टर, द्रावण खते, जिप्सम, हिरवळीची खते -ताग, धैचा व इतर यांचा पुरवठा मंडळामार्फत करण्यात यश आले आहे. याशिवाय २०० शेतकऱ्यांना गटा-गटाने वापरण्यासाठी खत पेरणी मशीन्स दिले गेले.

४. गहू हरभरा **बीजप्रक्रिया** केले **वाण** शेतकऱ्यांपर्यत पोहचवण्याचे कार्य मंडळ करते.

**५. दुभत्या जनावरांना चारा** उपलब्ध करून देण्यासाठी महाराष्ट्र शासनाच्या कृषी विभागाच्या वैरण विकास कार्यक्रमांतर्गत खरीप व रब्बी हंगामात कडवळ, आफ्रिकन टॉल मका यासारख्या चारा पिकांचे वाण सोबत युरिया शेतकऱ्यांना पुरवला गेला. यामध्ये मंडळाचे योगदान महत्त्वपूर्ण आहे.

**६. शेतकरी अभ्यास दौरे -** केवळ पुस्तकी ज्ञानातून शेतकऱ्यांच्या विचारात क्रांती होणार नाही तर त्याच्या जोडीला प्रत्यक्ष स्थळ भेटी देवून विषय पक्का करण्यावरती सयाजीरावांचा भर असल्याने शेतकऱ्यांना गटा गटाने राहूरी विद्यापीठ, दापोली विद्यापीठ, वसंतदादा शुगर इन्स्टिटयूट, मांजरी, पुणे, पाडेगांव ऊस संशोधन केंद्र, विविध ठिकाणची राज्यस्तरीय प्रदर्शने येथे शेतकरी अभ्यास दौरे व भेटीचे आयोजन करण्यात आले.

**७. सिनामाई शिरपूर जलसंधारण प्रकल्प -** पाणी आडवा पाणी जिरवा या शासनाच्या उपक्रमाला खास रिधोरे येथील भौगोलिक परिस्थितीनुसार आकार देण्याच्या कल्पनेतून सिनामाई शिरपूर जलसंधारण प्रकल्प आकारास आला. गावालगतच्या आरडा नावाच्या ओढयामध्ये पावसाळयात करोडो लिटर पाणी वाहून जात होते. ते अडवले तर परिसरातील शेतकऱ्यांना त्याचा फायदा होईल या विचारातून सयाजीराव व मंडळाच्या सदस्यांनी शिरपूर पध्दतीचा वापर येथे केला. लोकसहभाग, विठ्ठलराव शिंदे सह. साखर कारखाना पिंपळनेर यांच्या सहकार्यातून आरडयाच्या ओढयाचे ४० मीटर रूंद व ३ ते ३ मीटर खोल खोदकाम करून पाणी अडवण्यात आले. यातून जमीनीवर साधारणपणे ४ ते ५ कोटी लिटर तर जमीनीच्या खाली मुरलेल्या अवस्थेमध्ये अंदाजे १० ते १२ कोटी लिटर पाणी उपलब्ध झाले. याचा लाभ सभोवतालच्या परिसरातील विहिरी व बोअर्सना झाला.[९] मंडळाने राबवलेला प्रकल्प सिनामाई जलसंधारण प्रकल्प म्हणून नावारूपास आला.

मागील कामाच्या अनुभवाच्या जोरावर सद्या दि. २१ जानेवारी २०१६ पासून सीना नदीतील गाळ काढण्याचे व नदी पात्राच्या रूंदीकरणाचे व खोलीकरणाचे काम युध्दपातळीवर चालू आहे. याच्या शुभारंभ प्रसंगी माढा तालुक्याचे तहसीलदार मा. सदाशिव पडदुणे साहेबांनी रिधोरे हे जिल्हयातील पहिले गाव असल्याचे गौरवोद्गार काढले.[१०] या कार्यामध्ये मंडळाचे सदस्य व ग्रामस्थांचेही योगदान महत्त्वपूर्ण आहे. आजपर्यंत सुमारे ४० हजार ब्रास गाळ नदी पात्रातून शेतकऱ्यांनी आपापल्या शेतामध्ये नेऊन टाकला आहे. याचे अंदाजे मुल्य १ कोटीच्या आसपास होते. हे सर्व लोकसहभागातून सिध्द झाले आहे. सीना

नदीच्या रूंदीकरणामुळे व खोलीकरणामुळे ८०० मीटर लांब व १०० मीटर रुंद व ३ मीटर खोलीकरणामुळे जवळ जवळ २५ कोटी लिटर पाणी साठवण क्षमता निर्माण होणार आहे. म्हणजेच नदी काठावरील १०० शेतकऱ्यांना प्रतिवर्षी २५ लाख लिटर पाणी मोफत पणे उपलब्ध होणार आहे.[११]

याशिवाय मंडळाने वनराई पध्दतीचे बंधारे, बांधावर वृक्षारोपण यासारख्या माध्यमातून पाणी बचतीचा संदेश समस्त शेतकरी वर्गाला दिला आहे. रिधोरे येथील सिनामाई जलसंधारण प्रकल्पाला भेट देवून तात्कालीन माढा तालुका पंचायत समितीचे सभापती मा. रणजितसिंह शिंदे यांनी मंडळाचे व सयाजीरावांचे कौतुक करून असा प्रकल्प संपूर्ण तालुकाभर राबवण्याच्या सूचना केल्या.

**८. शेडनेट प्रकल्प उभारणी -** सातत्याने शेतीवर घोंघावणाऱ्या नैसर्गिक संकटामध्ये गारपीट नावाचे संकट महाप्रलयकारी ठरत आहे. याच्या जोडीला नवनवीन रोग आहेत. यातून मार्ग काढण्यासाठी सयाजीराव व मंडळातील सदस्य शेतकऱ्यांनी काळाची व निसर्गाची पावले आहेळखून नियंत्रित शेती करण्याकडे आपली पावले वळवली. यातून मंगळवेढा, मोहोळ, पंढरपूर, पुणे इत्यादी भागातील शेडनेट प्रकल्पाला भेटी दिल्या. आपल्याही गावात व परिसरात आपण हे उभारू शकतो हा आत्मविश्वास आल्याने सयाजीरावांच्या मार्गदर्शनाखाली रिधोरे येथील ८ व तांदुळवाडी येथील एका शेतकऱ्याने आपल्या शेतामध्ये २० गुंठ्यापासून ते ४० गुंठ्यापर्यंतचे शेडनेट उभे केले आहेत.[१२] यामध्ये ढोबळी मिरची (शिमला मिरची) चे उत्पादन घेतले जाते. रिधोरे गावातील शेतकऱ्यांनी आधुनिक, प्रगत शेती तंत्राच्या दिशेने उचललेल्या कार्यामध्ये मंडळाने मोलाचे सहकार्य केले आहे. हे मंडळाच्या आत्तापर्यंतच्या कार्याचे सर्वोच्च शिखर आहे. शेडनेट प्रकल्प उभे करणारे जिगरबाज शेतकरी श्री. प्रविण गायकवाड, श्री. सुशिल गायकवाड, श्री. दत्तात्रय भानुदास गायकवाड, श्री. दत्तात्रय अर्जुन गायकवाड, श्री. गणेश चौधरी, श्री. नागनाथ कणसे, श्री. हनुमंत गायकवाड, श्री. सोमनाथ चव्हाण (सर्व रिधोरे), श्री. बालाजी जाधव (तांदुळवाडी) हे आहेत. शेडनेटच्या उभारणीपासून ते पिक पदरात पडे पर्यंत सयाजीरावांचे मार्गदर्शन लाभत आहे. शेडनेटच्या उभारणीने आपल्या आयुष्यात व कुटुंबात आमुलाग्र बदल झाल्याची प्रतिक्रिया श्री. प्रविण गायकवाड यांनी दिली.[१३]

**९. वृक्ष बीजे लागवड -** दुष्काळावरती मात करावयाची असेल तर वृक्षारोपण केले पाहिजे. या विचारांनी सयाजीराव व मंडळातील सदस्यांनी जून २०१५ च्या मोसमात चिंचगाव टेकडी येथील माथ्यावर व उतारावर विविध प्रकारच्या हजारों वृक्ष बीया टोकल्या. यावेळी चिंचगाव टेकडीवरील रामानंद सरस्वती महाराज उपस्थित होते.

**१०. व्यक्तिमत्व विकास शिबीरे व व्याख्याने -** मंडळ फक्त शेती विषयक काम करत नाही तर गावातील तरुणांच्या मनावर संस्कार करून देशाचे आदर्श नागरिकही तयार करते. आजपर्यंत श्री श्री रविशंकर यांच्या आर्ट ऑफ लिव्हिंग च्या बेसिक कोर्सचे आयोजन केले, माऊंट आबू येथील प्रशिक्षणातही सहभाग घेतला यावेळी गावातील अनेक स्त्री पुरुषांनी सहभाग घेतला. याशिवाय श्री. दिनकर गांगल, वरिष्ट पत्रकार, मुंबई , श्री. संजय आवटे पत्रकार साम मराठी वाहिनी, डॉ. अविनाश पोळ, नाम सामाजिक संस्थेचे सदस्य, कोल्हापूर, राम खंकाळ, एक गाव एक पाणवठा कार डी.डी.सहयाद्री वाहिनीचे निवेदक इ. अनेक मान्यवरांनी आपल्या व्याख्यानांतून गावातील युवकांच्या व्यक्तिमत्व विकासासाठी मार्गदर्शन केले.

**निष्कर्ष :**

दुष्काळी सोलापूर जिल्हयातील रिधोरे गावच्या तरूण शेतकरी व सयाजीराव सारख्या कृषी अधिकाऱ्यांनी लोकसहभागातून केलेले विविध उपक्रम कौतुकास्पद, मागदर्शक, प्रेरक आहेत. जागतिकीकरणामुळे जसे सर्व क्षेत्रामध्ये बदल झाले तसेच शेती क्षेत्रामध्येही नवनवीन आव्हाने, समस्या यांनी डोकी वर काढली. आव्हानांना, संकटांना न घाबरता शेतकरी आत्मनिर्भर, स्वावलंबी, स्वयंपूर्ण, सशक्त झाला पाहिजे या ध्येयाने प्रेरित होवून सिनामाई कृषी विज्ञान मंडळ व शेतकरी ज्ञान मंदीराची स्थापना झाली. मंडळाने गावामध्ये व परिसरात राबवलेल्या पिकांची लागवड, चारापिके वाटप, वृक्ष लागवड, खत वाटणी , नवनवीन तंत्रज्ञान, शेडनेट उभारणी, जलसंधारण यासारख्या कार्यातून नक्कीच महाराष्ट्र व देशातील शेतकऱ्यांना नवीन दिशा मिळेल. एकटा शेतकरी काही करू शकणार

नाही, ज्यावेळी अनेक शेतकरी एकत्र येतील त्याच वेळी गावाचा, परिसराचा चेहरा मोहरा नक्कीच बदलू शकतो हे मंडळाच्या कार्यावरून दिसते. कर्मयोग, भक्तीयोग, राजयोग या सर्वांपेक्षा ज्ञानयोग श्रेष्ठ आहे. ज्ञानयोगाच्या प्रसारासाठी रिधोरे येथील मंडळाच्या माध्यमातून उभारलेले शेतकरी ज्ञान मंडळ मार्गदर्शक आहे. भविष्यात गावोगावी बळीराजाची सेवा करण्यासाठी अशी ज्ञान मंदीरे उभी राहावीत, त्यानेच शेतकऱ्यांचे कल्याण, समृध्दी होईल.

**संदर्भ :**

१. प्रत्यक्ष मुलाखत, मा. सरपंच, रिधोरे ग्रामपंचायत.दि. २२-०२- २०१६.
२. प्रत्यक्ष मुलाखत, श्री. सुब्राव बापू गायकवाड (वय ८५), ग्रामस्थ रिधोरे. दि. २०-०२-२०१६.
३. पवार विनायक (संपा.), शेतकरी (मासिक), कृषी विभाग, महाराष्ट्र राज्य, फेब्रुवारी २०१४, पृ.५७.
४. पवार श्रीराम (संपा.), ॲग्रोवन दिवाळी अंक, सकाळ पेपर्स, पुणे, २०१५, पृ.८७.
५. दै.सकाळ, ॲग्रोवन, दि. २ डिसेंबर २०११, पृ.८.
६. मंडळाची घटना, पृ. ५.
७. प्रत्यक्ष मुलाखत, श्री. सयाजीराव गायकवाड, कृषी सहायक, सचिव, सि.कृ.वि.मंडळ, रिधोरे, दि. १ मार्च २०१६.
८. क्षीरसागर उज्ज्वला, www.thinkmaharashtra.com/node/2143, p;2, 2016.
९. शेतकरी, उ.नि., पृ. ५७.
१०. दै. लोकमत, दि.२५-१- २०१६, पृ. ६.
११. प्रत्यक्ष मुलाखत, श्री. सयाजीराव गायकवाड
१२. पवार श्रीराम (संपा.), उ.नि.पृ. ९०.
१३. प्रत्यक्ष मुलाखत, श्री. प्रविण गायकवाड, शेडनेट शेतकरी, रिधोरे, २ मार्च २०१६